PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Suwasini
Year: 1961

Song: Me Tar Prem Diwani 2
Lyricist: Ga. Di. Madgulkar

मी तर प्रेमदिवाणी
हो...
मी तर प्रेमदिवाणी
माझे दु:ख न जाणे कोणी
माझे दु:ख न जाणे कोणी
हो... मी तर प्रेमदिवाणी
हो... मी तर प्रेमदिवाणी
आर्ताची गत आर्ता ठावी
कळ ज्या अंतःकरणी
स्थिती सतीची सतीच जाणे
जिती चढे जी सरणी
माझे दु:ख न जाणे कोणी
माझे दु:ख न जाणे कोणी
हो...मी तर प्रेमदिवाणी
हो...मी तर प्रेमदिवाणी

शूळावरती शेज आमुची
कुठले मिलन सजणी
गगन मंडळी नाथ झोपती
आमुच्या दैवी धरणी
माझे दु:ख न जाणे कोणी
माझे दु:ख न जाणे कोणी
हो...मी तर प्रेमदिवाणी
हो...मी तर प्रेमदिवाणी

दुखणाईत मी फिरते वणवण
वैद्य मिळेना कोणी
दुखणाईत मी फिरते वणवण
वैद्य मिळेना कोणी
या मीरेचा धन्वंतर हरी
शामल पंकज पाणी
शामल पंकज पाणी
माझे दु:ख न जाणे कोणी
माझे दु:ख न जाणे कोणी
हो...मी तर प्रेमदिवाणी
हो...मी तर प्रेमदिवाणी

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*